# सूचनापत्र

**पोलीस शिपाई चालक पदी निवड झाल्याने दिनांक ११/७/२०२२ रोजी पोलीस मुख्यालय सिंधुदुर्ग येथे उपस्थित रहावे. उपस्थित राहताना पुढील प्रमाणे साहित्य आणावे.**

१) नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना मेस करीता रुपये ५०००/- ॲडव्हान्स भरणे आवश्यक असल्याने सदरची रक्कम येताना बरोबर आणावी.

२) हजर होणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा.गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, इतर साहित्य, बाड-बिस्तारा, ताट, वाटी, तांब्या तसेच बादली, मग वगैरे साहित्य बरोबर आणावे.

३) बँक खाते, डीसीपीएस/एनपीएस खाते व सेवापट उघडणेसाठी पासपोर्ट साईजचे स्वतःचे ६ फोटो मुळ पॅन कार्ड व आधार कार्ड सोबत आणावे.

---

३६९५

जा.क्र.आशा/प्रलि/चा.पो शि भरती-२०१९/ /२०२२
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय, सिंधुदुर्ग,सिंधुदुर्गनगरी.
दूरध्वनी क्रमांक-०२३६२-२२८२००/२२८००८
फॅक्स क्रमांक -०२३६२-२२८२०५
E-Mail - sp.sindhudurg@mahapolice.gov.in
दिनांक :- ५ /७/२०२२

---

संदर्भ :-महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश ) नियम - २०१९, क्र.एमटीएस- ०९०९/ १५३२/प्र.क्र.५९२/पोल-४ दिनांक ६/९/२०१९

विषय:- पोलीस शिपाई चालक भरती - २०१९
पोलीस शिपाई चालक पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीबाबत..

****

**आ दे श :-**

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस घटकात सन २०१९ मध्ये रिक्त असलेल्या पोलीस शिपाई चालक पदाकरिता पोलीस भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. सदर पोलीस भरती दरम्याने लेखी चाचणी, चालक कौशल्य चाचणी व मैदानी चाचणी मध्ये पात्र व गुणानुक्रम, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमुद पुरुष उमेदवारांची पोलीस शिपाई चालक पदासाठी निवड झालेली आहे. तद्नंतर सदर उमेदवार वैद्यकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई चालक पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, भाग-१ मधील नियम क्र.६३ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार खालील उमेदवारांना सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवर " पोलीस शिपाई चालक (गट-क) " या संवर्गात सुधारीत वेतन मॅट्रीक मधील वेतन स्तर एस-७ रुपये २१७००-६९१०० व विशेष वेतन रुपये ७५०/- (अधिक नियमानुसार वेतन व भत्ते) या वेतनावर पोलीस मुख्यालय, सिंधुदुर्ग येथे दिनांक ११/७/२०२२ पासून खाली नमुद केलेल्या अटी व शर्तींचे अधीन राहून अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | चेस्ट नंबर | उमेदवाराचे नाव | लिंग | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५९ | बाबासाहेब ज्ञानदेव साबळे | पुरुष | खुला | खुला | -- | ४३ |
| २ | ६८ | समिर रविंद्र फोंडके | पुरुष | इमाव | खुला | -- | ६० |
| ३ | ४१ | प्रथमेश प्रभाकर बुटे | पुरुष | खुला | खुला | -- | १४८ |
| ४ | ५२ | महेश शिवदास रायते | पुरुष | इमाव | खुला | माजी सैनिक | १८८ |
| ५ | १४ | अनिल संभाजी कांबळे | पुरुष | अजा | अजा | -- | १८९ |
| ६ | १७ | प्रकाश भिमराव कांबळे | पुरुष | अजा | अजा | -- | २५७ |
| ७ | ६९ | प्रथमेश दत्ताराम कदम | पुरुष | अजा | अजा | -- | २६१ |
| ८ | २६ | रमेश केरबा करडीले | पुरुष | अजा | अजा | -- | २६६ |
| ९ | १११ | पांडूरंग पुताजी पारधी | पुरुष | अज | अज | -- | २६८ |
| १० | ३७ | राजु दामू भोये | पुरुष | अज | अज | -- | २७१ |
| ११ | ११ | तुकाराम दिलीप बिबे | पुरुष | एनटी-सी | एनटी-सी | -- | २७२ |
| १२ | ८ | गजानन संभाजी गिते | पुरुष | एनटी-डी | एनटी-डी | -- | २७६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | ४४ | वैभव विला पेडणेकर | पुरुष | इमाव | इमाव | -- | २७८ |
| १४ | ५८ | श्रीकांत विलास महामुणी | पुरुष | इमाव | इमाव | -- | २७९ |
| १५ | १० | समाधान राजेंद्र शिंदे | पुरुष | इमाव | इमाव | -- | २८० |
| १६ | ४८ | सचिन सुरेश चव्हाण | पुरुष | इमाव | इमाव | माजी सैनिक | २८२ |
| १७ | १०३ | विक्रम मोहन पवार | पुरुष | इडब्ल्युएस | इडब्ल्युएस | -- | २८७ |
| १८ | १३ | विकास विश्वानाथ कापसे | पुरुष | इडब्ल्युएस | इडब्ल्युएस | -- | २९६ |
| १९ | १०२ | विक्रमशहा दिलीप शेरेकर | पुरुष | इडब्ल्युएस | इडब्ल्युएस | -- | ३०१ |

अटी व शर्ती खालील प्रमाणे -

१. आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील. शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सूचना न देता केव्हाही सेवेतून सेवामुक्त करण्यात येईल.

२. महाराष्ट्र शासन, साप्रवि शा.नि.क्र.बीसीसीस-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहून निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यात आलेली आहे.

३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहिल. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी संबंधीत जात पडताळणी समितिकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. संबंधीत जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात पडताळणीचे प्रस्ताव ६ महिन्याचे आत निकाली काढणेबाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर तुम्हांस दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यांत येईल व तुमच्या विरुध्द अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागासप्रवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० यातील तरतुदीनुसार तसेच शासनाच्या प्रचलित धोरण/नियमानुसार त्वरीत कारवाई करण्यांत येईल.

४. याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीटाने दिनांक २५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

५. पोलीस शिपाई चालक पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात पूर्वचारित्र्य पडताळणी अहवालासंदर्भात प्रतिकुल फेर अहवाल प्राप्त झाल्यास, संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. तसेच पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून टेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.तसेच पोलीस शिपाई चालक भरतीमध्ये डमी उमेदवार बसवून लेखी परीक्षा, वाहन चालक कौशल्य चाचणी किंवा शारीरिक चाचणी परीक्षा देऊन निवड झाल्याचे भविष्यात निष्पन्न झाल्यास त्याबाबत होणाऱ्या कारवाईस संबंधीत उमेदवार जबाबदार राहील.

६.  पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological test) घेण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

७.  प्रशिक्षण कालावधीत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांना दुखापत झाल्यास, त्याबद्दल ते कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

८.  प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. पोलीस दलामध्ये मुलभूत प्रशिक्षणानंतर त्यांची मोटार परिवहन वगैरे विभागामध्ये आवश्यकते प्रमाणे नेमणूक केली जाईल व ती त्यांच्यावर बंधनकारक राहिल.

९.  प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांत दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा ऱ्हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त ( Terminate ) करण्यांत येईल.

१०.  सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवर नियुक्ती दिल्यानंतर, बेशिस्त/गैरवर्तन किंवा गंभीर स्वरुपाची कसुरी निदर्शनास आल्यास, त्यांची या घटकाचे कार्यक्षेत्राबाहेर इतर कोणत्याही घटकांत कोठेही व केव्हाही बदलीस पात्र होतील.

११.  पोलीस शिपाई चालक पदाचा राजीनामा दिल्यास, पुर्ननियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

१२.  ज्या संवर्गातून/जातीच्या प्रवर्गातून पोलीस शिपाई चालक पदी भरती झाली आहे तो संवर्ग/प्रवर्ग नंतर बदलता येणार नाही.

१३.  पोलीस शिपाई चालक पदावर रुजू झाल्या तारखेपासून तीन महिन्यांचे आत उमेदवाराने महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि.क्र.सीआर-१०७९/२०५९/२२३/११, दिनांक २०/११/१९८० नुसार विहीत केलेले भत्ते व दायित्व ( Assets and Liabilities ) बाबतचे विवरणपत्र स्वत:हुन भरुन संबंधित आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

१४.  शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना नविन परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना आपणांस लागू होणार नाही.

१५.  शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/बारा, दिनांक २८/३/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील नियम ४ नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/३/२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे सेवेत राहण्यास अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

१६.  महाराष्ट्र शासन, गृहविभाग पत्र क्र.पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ, दिनांक २६/९/२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांच्याकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि खर्च वसुली/२०१२/२२३१, दिनांक २६/४/२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायाने प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात पोलीस शिपाई चालक पदावरील नोकरीचा

राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवाराने जितक्या महिने प्रशिक्षण घेतले आहे त्या प्रशिक्षणाचा खर्च म्हणून प्रती महिना रुपये २०००/-( प्रती मसिक दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसुल करण्यांत येईल व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे आपणास बंधनकारक आहे.

१७. पोलीस शिपाई चालक पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली १९५९ भाग-१ मधील नियम ७८(१)(v) ते (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्यात येईल.

१८. पोलीस शिपाई चालक पदासाठी शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधित पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पूर्ण करण्यास टाळाटाळ केल्यास पोलीस प्रशिक्षणांत/प्रशिक्षण पूर्ण करण्यांत स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणांस गैरहजर राहिल्यास/भगोडा झाल्यास, मुंबई पोलीस नियमावली १९५९ भाग-१ मधील नियम ७८ उप नियम(१) मधील viii खालील टिप नुसार तुमची सेवा समाप्त ( Terminate from Service) करण्यात येईल.

१९. महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश ) नियम - २०१९, क्र.एमटीएस-०९०९/१५३२/प्र.क्र.५९२/पोल-४ दिनांक ६/९/२०१९ मधील नियम १५(१) अन्वये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक पदासाठी विहीत केलेले मुलभूत प्रशिक्षण, अन्य प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील. प्रशिक्षणाअंती घेण्यात येणारी परीक्षा ०४ संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर ०४ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाली नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

२०. महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश ) नियम - २०१९ मधील नियम १६(१) पोलीस शिपाई चालक पदाकरीता निवड करण्यात आलेले उमेदवार हे कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार विनंतीनुसार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र ठरतील व महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीसस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश ) नियम - २०१९ मधील नियम १६(२) अन्वये पोलीस शिपाई चालक पदावर नियुक्त केलेला कर्मचारी त्यांच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातून इतर पोलीस घटकात बदलीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी राज्य शासनाच्या मान्यतेने केलेली बदलीसाठी पात्रता, बदली प्रक्रिया, सक्षम प्राधिकारी, जेष्ठता आणि इतर अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्र राहील.

२१. महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीसस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश ) नियम - २०१९, मधील नियम ०६ चा उपखंड (१)(क)(२) नुसार सदर पदावर नियुक्त उमेदवारांनी जड वाहन (HGV) आणि जड वाहन प्रवासी (HPMV) चालविण्याचा परवाना नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून पुढील ०५ वर्षात प्राप्त करणे बंधनकारक राहील. अन्यथा तो पुढील वेतनवाढीस तसेच पदोन्नतीकरिता पात्र राहणार नाही.

२२) आपणास महाराष्ट्र शासन नियमानुसार हिंदी व मराठी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसेल तर हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

२३) या आदेशान्वये नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१, महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) १९५६, महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीसस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश ) नियम - २०१९ तसेच राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील. सदर नियमातील तरतुदीनुसार उमेदवारास कोणतीही पुर्व सूचना न देता सेवामुक्त करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

२४. उमेदवार कर्तव्यावर रुजु होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहणेबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल.

२५. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणास पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परीक्षा द्यावयाची असल्यास त्या परीक्षेस बसण्यासाठी अर्ज करणेपूर्वी त्यांनी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२६. मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/६/१०/पो.शि.भरती/सेवाजेष्ठता/२५१/२०१२ दिनांक १७/८/२०१३ अन्वये स्थायी आदेश क्र.२२/२०१३ मधील तरतुदीनुसार सेवाजेष्ठता निश्चित करण्यांत येईल.

२७. आपण समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर केलेले समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र भविष्यात खोटे अगर चुकीचे असल्याचे आढळून आल्यास आपली सेवा कोणतेही कारण न देता तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

२८. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही आय पी ६७/प्र.क्र.२०७/कार्या १२ दिनांक २८/५/२०१८ व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून ३० दिवसांचे आंत संबंधीत उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यांत येतील. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणाऱ्या कारणांचा विनंतीचा विचार केला जाणार नाही. या नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

( राजेंद्र दाभाडे )
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग.

प्रति,

वरील सर्व संबंधित उमेदवार

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१) राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय सिंधुदुर्ग.

२/- सदरचे आदेश मुख्यालयाच्या नोटीस बोर्डवर त्वरीत डकविण्यात यावे. तसेच वर नमुद नवप्रविष्ट पोलीस शिपाई चालक हे कर्तव्यावर हजर झाल्यावर त्यांना सदर आदेश अदा करुन दुय्यम प्रत इकडील कार्यालयात ते कर्तव्यावर केव्हा हजर झाले या दिनांकासह इकडील कार्यालयास सादर करावी. कर्तव्यावहर हजर झालेनंतर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांना किटपेटी व इतर सरकारी सरंजाम अदा करावा.

३/- वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांचे बँक खाते उघडण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

२) प्रमुख लिपीक, लेखा शाखा

२/- शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांची १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने त्यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना अंतर्गत विहित नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. सदर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना लवकरच मुलभूत प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार असल्याने सदरची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करावी. ३) जिल्हा पोलीस दर्शनिका

४) प्रभारी अधिकारी, सायबर शाखा सिंधुदुर्ग

२/- वरील प्रमाणे नियुक्ती आदेशाची समज सर्व उमेदवारांना फोनद्वारे तसेच एसएमएसद्वारे देऊन त्यांना दिनांक ११/७/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजेपर्यत पोलीस मुख्यालय येथे हजर राहण्याची समज द्यावी.